**MHRG110003082017**

<u>नियमित दिवाणी दावा क्र.४९/२०१७ मधील निशाणी क्र.४० खालील आदेश</u>

**(कुसुम शेट वगैरे वि. शरद दुदुस्कर वगैरे)**

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश सेट असाईड रद्द होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द दाव्याचा ताबा, भाडेबाकी व भाडे नुकसानी मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादींनी सरतपास प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. परंतु उलट तपासकामी प्रतिवादी गैरहजर असल्याने दिनांक १७.०९.२०२५ रोजी उलटतपास घेतला नसल्याने प्रतिवादीतर्फे उलटतपास नाही असा आदेश झाला आहे. प्रतिवादीचे आजारपणामुळे गैरहजर असल्याने उलटतपास घेणे शक्य नव्हते. तरी प्रतिवादींविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

३. वादींतर्फे विद्वान विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. वादीने सरतपास दि.१४.१०.२०२४ रोजी दिला आहे. तेव्हापासुन प्रकरण उलटतपासाठी प्रलंबित आहे. अर्जास संयुक्तीत कारण नसल्यामुळे प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती वादींनी केली आहे.

४. नि.४० वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींनी आजारी असल्याचे कारण नमूद केले आहे. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीचा ताबा, भाडेबाकी, भाडे नुकसानी मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादींना त्यांची

MHRG110003082017

बाजू मांडून, दाव्याकामी उलटतपासाची संधी दिल्यास दाव्याचे कामकाज पुढे चालून दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वानुसार प्रतिवादींना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी उलटतपास घेण्यास केलेला विलंब विचारात घेता, प्रतिवादींनी वादीस कॉस्ट देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादींचा निशाणी क्र.४० वरील अर्ज वादीस र.रु.४००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.12.10 11:41:53 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः-०८.१२.२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.